# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly Pune University)

Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone: 020-25621188/89
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in


**<u>तातडीचे व महत्वाचे</u>**

**परिपत्रक क्र. २२ /२०२६**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०८(१)(च) मधील तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या, अर्हता, सेवेच्या अटी व शर्ती तसेच वित्तलब्धी या, विद्यापीठाने व राज्य शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असणे आणि त्या अभ्यास पाठयक्रम, अध्यापन, प्रशिक्षण आणि संशोधन यांच्याकरिता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असणे ही संलग्नीकरण तसेच मान्यता यांकरिताची अट असून त्याचे अनुपालन करणे संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांवर बंधनकारक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने संबंधित संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नियमित आणि तदर्थ स्वरुपात नियुक्त झालेले आणि विद्यापीठाची मान्यता असलेले एकत्रितपणे किमान ५०% शिक्षक असणे आवश्यक आहे. ज्या संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नियमित आणि तदर्थ स्वरुपात नियुक्त झालेले आणि विद्यापीठाची मान्यता असलेले एकत्रितपणे किमान ५०% शिक्षक कार्यरत नसतील, अशा संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना सदर पूर्तता करण्याकरिता दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत मुदत तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, विद्यापीठ अनुदान आयोग तसेच शासनाने विहीत केलेल्या किमान मानकांनुसार ज्या संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत नियमित आणि तदर्थ स्वरुपात नियुक्त झालेल्या आणि विद्यापीठाची मान्यता असलेल्या शिक्षकांची किमान संख्या एकत्रितपणे ५०% पेक्षा कमी असेल, अशा संलग्नित महाविद्यालयांतील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२६ – २७ मध्ये थांबविण्यात यावेत, असा मा.विद्यापरिषदेने दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. वि.प.अ १५पीए/१५/२०२६ नुसार निर्णय घेतलेला आहे.

याबाबत प्राप्त आदेशानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सर्व संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये दिनांक ३१ मार्च, २०२६ पूर्वी नियमित आणि तदर्थ स्वरुपात नियुक्त झालेल्या आणि विद्यापीठाची मान्यता असलेल्या शिक्षकांची किमान संख्या एकत्रितपणे ५०% पेक्षा कमी असल्यास, संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थामधील संबंधित अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६ – २०२७ मधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचा निर्णय घेण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेऊन याबाबत आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी.

संदर्भ क्र. : संपि/९८० )
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२६ )

(प्रदिप कोळी)
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

प्रति,

१. मा.अध्यक्ष/सचिव, संबंधित संस्था
२. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ